ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये
पुन:स्थापित करणेबाबत.
श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित तत्कालीन
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-वडगांव,
ता.कोपरगांव

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/२५७/२०२५
अहिल्यानगर दिनांक१६/०९/२०२५

संदर्भ :- १. सेवा निलंबन आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३३०/२०२२, दिनांक- १५/०४/२०२०
२. या कार्यालयाकडील पत्र क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/३२२/२०२०, दिनांक- १८/०३/२०२०
३. या कार्यालयाकडील आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/६२९/२०२१; दिनांक- २३/०९/२०२१
४. या कार्यालयाकडील पत्र क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/५४८/२०२२,दिनांक- ०६/०७/२०२२
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (३)(१)
६. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५
७. सेवा निलंबन आढावा समिती मधील सूचना दि.०७.०७.२०२५.

ज्याअर्थी,श्री.बाळू जगन्नाथ डोळस,सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी, यांना ग्रामपंचायत वडगांव, ता.कोपरगांव येथे कार्यरत असताना ग्रामपंचायत कामकाजामध्ये अनाधिकृत गैरहजर, गैरवर्तन व गैरव्यवहार केल्यामुळे संदर्भीय आदेश क्र.१ अन्वये, सेवा निलंबित करणेत आलेले होते.

सबब,संदर्भ क्र.७ मधील चर्चेनुसार श्री.बाळू जगन्नाथ डोळस, यांचा सेवानिलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने व त्यांचे कडील गैरवर्तनाबाबतची कायमस्वरुपी अपहारीत रक्कम रुपये ६३५५६/- वसुलीची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरु आहे. सबब श्री.बाळू जगन्नाथ डोळस यांचे विभागीय चौकशी अहवालावरील शिस्तभंगाविषयक कार्यवाहीस अधिन राहुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर याव्दारे, श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी,यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती अहिल्यानगर येथे पुन:स्थापित करीत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की, श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी,यांचे निलंबन कालावधीचा निर्णय स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

या आदेशाची नोंद श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित ग्रामविकास अधिकारी, यांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९१६०६०१५७ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:21:05
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी,कोपरगाव. मुख्यालय श्रीरामपुर

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपूर

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबत दुय्यम प्रतीवर त्यांची तारखेसह स्वाक्षरी घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अहवाल सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती - अहिल्यानगर

२/- श्री.बाळू जगन्नाथ डोळस, सेवा निलंबित ग्रामपंचायत अधिकारी, हे ग्रामपंचायत अधिकारी या पदावर सेवेत रुजू झालेनंतर रुजू अहवाल इकडेस सादर करावा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगांव, यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- सामान्य प्रशासन विभाग-२, ग्रामपंचायत आस्थापना-१, जि.प.अहिल्यानगर.